# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः10.07.2025 वारःगुरुवार

1. पंतप्रधानांचा पाच देशांचा यशस्वी दौरा, नामिबियासोबत महत्वाचे करार
2. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर तुकडेबंदी कायदा शिथिल करण्याचा निर्णय
3. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
4. रस्त्यावर फिरणाऱ्या शालाबाह्य मुलांसाठी मिशन वात्सल्य आणि
5. विदर्भात पूरस्थिती, अतिवृष्टिचा इशारा

**पंतप्रधान-नामिबिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घाना, त्रिनिदाद आणि टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामिबिया या पाच देशांचा दौरा यशस्वीरित्या केला. दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात, भारत आणि नामिबियानं मोदी यांच्या उपस्थितीत नामिबियामध्ये उद्योजकता विकास केंद्राची स्थापना आणि आरोग्य आणि औषध क्षेत्रातील सहकार्य यासंदर्भात दोन सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. या वर्षाच्या अखेरीस नामिबियामध्ये डिजिटल पेमेंट सिस्टीम सुरू करणं आणि भारताच्या नेतृत्वाखालील आपत्ती निवारक पायाभूत सुविधांसाठी आघाडी आणि जागतिक जैव इंधन आघाडी या जागतिक उपक्रमांमध्ये नामिबियाचा प्रवेश यासारख्या तीन प्रमुख घोषणा देखील या भेटीदरम्यान करण्यात आल्या. आकाशवाणीच्या प्रतिनिधी अपर्णा खुंट यांनी नामिबियातील विंडहोक इथून पाठविलेला हा वृत्तांत...

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नामिबिया दौरा हा त्यांच्या पाच देशांच्या प्रवासातील शेवटचा टप्पा होता जो भारत-नामिबिया द्विपक्षीय संबंधांच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरला. जवळपास 30 वर्षांनंतर भारतीय पंतप्रधानांचा नामिबियाला हा पहिलाच दौरा होता. दोन्ही देशांमधील आरोग्यसेवा, यूपीआय सारख्या डिजिटल पेमेंट सिस्टीम आणि कौशल्य विकास यासारख्या क्षेत्रात भागीदारी हे या दौऱ्याचे मोठे यश म्हणता येईल. नामिबियाच्या विकासात भागीदारी वाढविण्या बरोबरच भारताचे आफ्रिकेशी संबंध मजबूत करण्यात या भेटीचे योगदान राहील. या दौऱ्यात पंतप्रधान मोदींना नामिबियाचा सर्वोच्च नागरी सन्मान देखील प्रदान करण्यात आला, जो भारत आणि नामिबियामधील वाढत्या विश्वासाचे प्रतीक आहे. एकूणच, ही भेट केवळ द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यापुरती मर्यादित नव्हती तर आरोग्य, तंत्रज्ञान आणि शिक्षण यासारख्या क्षेत्रात एकत्र काम करून भारताच्या "ग्लोबल साउथ" धोरणाला वेग देणारी ठरली. आकाशवाणी बातम्यांसाठी, विंडहोकहून अपर्णा खुंट.**

**आदिवासी जमीन**

विविध जिल्ह्यातील आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना बेकायदेशीरपणे हस्तांतरित करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांची चौकशी विभागीय आयुक्तांमार्फत करून तीन महिन्यात त्याचा अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल अशी ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. शेत जमिनीव्यतिरिक्त इतर आदिवासी जमिनी चौतीस नियमांचं पालन करून बिगर आदिवासींना हस्तांतरित करण्यासाठी परवानगी देता येते मात्र याप्रकरणी आलेल्या सर्व 1628 तक्रारींची चौकशी करण्यात येईल असं मंत्री म्हणाले.

**तुकडेबंदी कायदा**

वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर तुकडेबंदी कायद्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी, यावर्षी एक जानेवारीपर्यंत नागरी क्षेत्रांमध्ये झालेल्या तुकड्यांनाना कायदेशीर दर्जा देण्यासाठी तुकडेबंदी कायदा शिथिल केला जाणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधानसभेत केली. ते म्हणाले......

**एक जानेवारी दोन हजार पंचवीस पर्यंत जे काही तुकडे झाले आहेत, एक गुंठ्याम हजार फूट चा प्लॉट लोकांनी घेतलेला आहे. पण आता तो रेग्युलर होऊ शकत नाही. रजिस्ट्री होत नाही. कारण तुकडे बंदी कायदा आहे. त्यामुळे आता नागरी भागामध्ये या तुकडे बंदी कायदा शिथिल करून या ठिकाणी मी पंधरा दिवसामध्ये सोपी तयार करतोय. एक जानेवारी दोन हजार पंचवीस ला कट ऑफ डेट ठेवून ही तुकडे बंदी कायदा या भागाकरता निरस्त करण्याचा विचार शासन करत आहे.**

महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, प्राधिकरण क्षेत्रं, तसंच गावठाणालगत 200 ते 500 मीटरपर्यंतचा भाग या निर्णयात समाविष्ट केला जाणार आहे. पुढील चर्चेनुसार, महानगरपालिकांच्या सीमेलगत दोन किलोमीटरपर्यंतचा भाग देखील विचारात घेतला जाईल. तसंच हा निर्णय केवळ तत्कालिक तुकड्यांना कायदेशीर ठरवण्यापुरता मर्यादित असेल. पुढील कोणतंही बांधकाम नियोजन प्राधिकरणांच्या नियमानुसारच करावं लागेल असंही त्यांनी नमूद केलं.

**आरोग्य सुविधा**

आरोग्य विभागाच्या पायाभूत सुविधा भक्कम करणं ग्रामीण आणि शहरी भागात लोकसंख्यानिहाय आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी काटेकोर नियोजन करावं. नागरी क्षेत्रातील आरोग्य प्रकल्पांच्या कामांसाठी प्रत्येक पालक सचिवांनी नियोजनबध्द कार्यक्रम आखून या कामांना गती द्यावी. तसंच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देऊन 'आपले सरकार' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**फिरणारी मुले शिक्षणाच्या प्रवाहात**

रस्त्यावर फिरणाऱ्या मुलांना समाज आणि शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचं पुनर्वसन करण्यासाठी राज्य शासनानं 'मिशन वात्सल्य' हाती घेतलं असून, त्याअंतर्गत 29 महानगरपालिका क्षेत्रांमध्ये 31 फिरती पथकं सुरू करण्यात येत आहेत. त्यासाठी आठ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**सर्वोच्च न्यायालयानं नोव्हेंबर 2021 मध्ये दिलेल्या आदेशानुसार सहा महानगरपालिका क्षेत्रात सुरु केलेल्या पथदर्शी प्रकल्पाच्या यशानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. 2021 मध्ये चारच महिने हा प्रकल्प राबविता आला. तरीही त्याला प्रेरणादायक प्रतिसाद मिळाला. या प्रकल्पाद्वारे नाशिक, पुणे, मुंबई शहर, ठाणे आणि नागपूर या पाच जिल्ह्यांतील रस्त्यावर फिरणाऱ्या शालाबाह्य मुलांना शैक्षणिक, मनोरंजन, आहार, तसंच आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात आल्या. त्यामुळं ती मुलं शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आल्याचं निदर्शनास आलं. यातील सर्वाधिक मुलं पुणे जिल्ह्यातील होती. त्यापैकी बाराशेहून अधिक मुलं शिक्षणाच्या प्रवाहात टिकून आहेत. या मुलांमध्ये पुन्हा शिक्षणाविषयी गोडी निर्माण करण्यात समुपदेशक अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. आता प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रात एका फिरत्या पथकाद्वारे रेल्वे आणि बस स्थानक, आणि गर्दीच्या ठिकाणी पाहणी करुन अशा मुलांची निवड झाल्यानंतर महिनाभर त्यांना महिला आणि बालविकास विभागातर्फेच शिकविण्यात येईल. या काळात विभागातील समुपदेशक त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्यात शिक्षणाविषयीची गोडी निर्माण करतात. नंतर त्यांची रूची पाहून त्यांना विविध शाळांमध्ये प्रवेश मिळवून दिला जातो. त्यामुळंच ही मुलं शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकून राहिली आहेत असं महिला आणि बालविकास विभागाचे कार्यक्रम व्यवस्थापक योगेश जवांदे यांनी सांगितलं. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी भूषण राजगुरुसह, लौकिका रास्ते, पुणे.**

**स्मार्ट वीजमीटर**

राज्यात विजेचे स्मार्ट पोस्टपेड मीटर योजनेंतर्गत 27 हजारपेक्षा जास्त फिडर मीटर आणि 38 लाख ग्राहक मीटर लावण्यात आले आहेत. या ग्राहकांना सौर तासांमधील विजेच्या वापरावर बिलामध्ये 10 टक्के सवलत देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधान परिषदेत सांगितलं.

**बालसुधारगृह अत्याचार**

छत्रपती संभाजीनगर इथल्या विद्यादीप बालसुधारगृहामधे अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणी जिल्हा बालविकास अधिकाऱ्याच्या तत्काळ निलंबनासह संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्याचे आदेश मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल

विधान परिषदेत दिले. या प्रकरणी चौकशी करण्यासाठी तीन वरिष्ठ महिला पोलीस निरीक्षकांची समिती स्थापन केली असून, सरकारी यंत्रणेतील प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभागीवर निलंबनाची कारवाई केली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

**आशिष शेलार**

लेखक, विचारवंत आणि व्याख्याते नरहर कुरुंदकर यांच्या स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी 3 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी काल विधानपरिषदेत दिली. नांदेडमध्ये हे स्मारक उभारण्यात येत आहे.

**पोलिस-रत्नागिरी**

नागरिकांना पोलिसांशी संपर्क साधणं आणि पोलिसांकडून माहिती मिळणं सोपं व्हावं, यासाठी रत्नागिरी पोलिसांनी तीन नवे उपक्रम जाहीर केले आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी काल त्याविषयी माहिती दिली.

**बेंदूर-सांगली**

बेंदूर सणानिमित्त सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागात युवकांनी बैलांना झुली घालून, शिंगे रंगवून मिरवणुका काढल्या. बैलांसह गोठ्यातील सर्व जनावरांची पूजा करुन त्यांना गव्हाच्या खिचडीची मेजवानी देण्यात आली, बैलांचे खांदे मळून त्यांची सेवा आणि त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

**क्रिकेट**

महिलांच्या टी-20 क्रिकेटमध्ये भारतानं काल चौथा सामना जिंकून मालिकेत इंग्लंडविरुद्ध 3-1 अशी आघाडी घेतली आहे. एजबॅस्टन कसोटीतील ऐतिहासिक विजयानंतर ऊर्जावान झालेला भारतीय संघ तिसऱ्या कसोटी सामन्यात आजपासून लॉर्ड्स मैदानावर यजमान इंग्लंडसोबत लढणार आहे. पाच सामन्यांची ही मालिका सध्या 1-1 अशी बरोबरीत आहे.

**विदर्भ पूर-यवतमाळ, नागपूर**

मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळं पूर्व विदर्भात पूरस्थिती निर्माण झाली आहे. गडचिरोली,यवतमाळ आणि भंडारा जिल्ह्यात नदी नाले भरून वाहत असून काही गावांचा संपर्क तुटला आहे. नागपूर शहरातही पुरपरिस्थिती निर्माण झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अनेक लोकांना पूरप्रदेशातून सुरक्षित बाहेर काढण्यात आलं.

**हवामान**

मुंबईला पाणीपुरवठा करणारा मोडक सागर तलाव ओसंडून वाहू लागला आहे. विदर्भाला जोराचे वारे आणि वीजांसह अतिवृष्टिचा इशारा देण्यात आला आहे. कोकणात आणि पश्चिम महाराष्ट्राच्या घाटमाध्यांवर जोराचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.